Rotary 2020-2021

# southern star ...अवघे धरू सुपंथ

*The official bulletin of Rotary Club of Pune South*

*Year : 51, Vol : 9, March 2021*

## कर्तृत्व नैसर्गिकच असतं....

योगी

**President :** Rtn. Sudarshan Natu | **Secretary :** Rtn. Manisha Belgaonkar | **Editor :** Rtn. Yogesh Nandurkar

# Speech of World Leader RIPE Shekhar Mehta



Speech of World Leader RIPE Shekhar Mehta to DGEs from India, at New Delhi Institute.

Enjoy Watching....

- रोटरीनं प्रत्येक महिना विशिष्ट कामासाठी योजला आहे. त्याबद्दल महत्त्व आणि काय करायचं हे सांगणारं पान
- शिवाय रोटरी इंटरनॅशनलबद्दल काही विशेष

रोटरी

तुमचा लेख आवर्जून द्या..
समन्वयक
योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे

# रश्मी उवाच

**रो. डीजी रश्मी कुलकर्णी**

### ६ फेब्रुवारी २०२१

ऐकण्यासाठी क्लीक करा...

### २ फेब्रुवारी २०२१

ऐकण्यासाठी क्लीक करा...



- आपला क्लब रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ मध्ये येतो.
- डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रश्मी कुलकर्णी यांचा संवाद
- या डिस्ट्रिक्टमधील विविध प्रोजेक्ट्स, कार्यक्रम
- डिस्ट्रिक्टमधील क्लब्सचे महत्त्वाचे, दखलपात्र असे प्रोजेक्ट्स

**डिस्ट्रिक्ट कनेक्ट**

तुमचा लेख आवर्जून द्या...
समन्वयक
योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे

साप्ताहिक सभा

# मध्य भारतातली जंगलसंपदा

**व्याख्याता – देवेंद्र गोगटे**

दिनांक – १ फेब्रुवारी २०२१




एक फेब्रुवारीला साप्ताहिक सभा संपन्न झाली. Forests of Central India (मध्य भारतातली जंगलसंपदा) हा व्याख्यानाचा विषय होता. पन्ना, बांधवगड, कान्हा, पेंच आणि ताडोबा ही मध्य भारतातली प्रमुख अभयारण्यं. विशेषतः वाघांसाठी ही अभयारण्यं प्रसिद्ध आहेत. एकमेव महाराष्ट्रात ताडोबा तर बाकीची मध्यप्रदेशात आहेत. २००७ मध्ये ‘बेस्ट टायगर रिझरवॉयर’ हा पुरस्कार मिळालेल्या पन्ना जंगलात २००८ मध्ये एकही वाघ नव्हता. या परिस्थितीवर भारत सरकारनी कशी मात केली? काय उपाययोजना केली याचं तपशिलवार वर्णन केलं आहे. जंगली प्राणीसुद्धा आपला अधिवास सोडू इच्छीत नाहीत हे समजलं. २०२० जानेवारीपर्यंत पन्नामधल्या वाघांची संख्या चाळीसपर्यंत पोहोचली आहे आणि वाघांची पाचवी पिढी इथे नांदते आहे. पन्ना जंगलात हिऱ्यांच्या खाणीदेखील आढळतात. पाच प्रकारचे विविध दगड पन्ना जंगलात सापडतात. पन्ना जंगलात मोठमोठ्या दऱ्या आहेत. वेगवेगळ्या प्रकारचे पक्षी, प्राणी, वृक्षवेली यांनी पन्ना जंगल संपन्न आहे.

पुराणात रामानं दक्षिण भारतावर लक्ष ठेवण्यासाठी लक्ष्मणाला या गडावर ठेवलं म्हणून याला बांधवगड म्हणतात अशी बांधवगड जंगलाची आख्यायिका सांगतात. स्वातंत्र्यपूर्वकाळात रीवा संस्थान हा जंगल सांभाळत होतं. या जंगलात पाण्याचे खूप जास्त स्रोत आहेत म्हणून हे जंगल सदैव हिरवंगार असतं. ग्रासलॅंड आहे. ऐन,तेंदू,बांबू,अर्जुन अशा विविध प्रकारच्या वृक्षांनी हे जंगल समृद्ध आहे.जाएन्ट वूड स्पायडर्स, वुड पेकर्स, इगल्स, जंगल कॅट्स, हरणं, सांबर, पट्टेरी वाघ अशी प्राणीसंपदा या जंगलात आढळते.

कान्हा हे जंगल हिवाळ्यात खूप सुरेख दिसतं. ब्रिटीशांनी या जंगलप्रदेशाचा खूप अभ्यास केला होता. या जंगलात रानकुत्र्यांच्या टोळ्या आढळतात. शिकार करताना या टोळ्यांमधलं टीमवर्क जाणवण्यासारखं आहे.

शिकारीदरम्यान मादी रानकुत्री टोळीचं नैतृत्व करताना दिसते. आकाशात उंच भरारी घेऊन रोल होत होत खाली येणारा इंडीअन रोलर हा पक्षी कान्हा जंगलात पाहायला मिळतो. सागवान, ऐन, बांबू यांसारखी झाडं या जंगलात आढळतात. या जंगल परिसरात मोहाची झाडं मोठ्या प्रमाणात आढळतात. इथल्या आदिवासींच्या आहारात मोहाच्या फुलांचा समावेश असतो. मोहाच्या फुलांनी नशा येते त्यामुळे त्यापासून तयार केलेली दारू इथले आदिवासी पितात. हरणं, अस्वलंदेखील मोहाची फुलं खातात. मोहाच्या झाडाला हिवाळ्यात बहर येतो. स्पॉटेड डीअर जिथं बघायला मिळतं असं पेंच जंगल महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशाच्या सीमाभागातल्या तीन जिल्ह्यांत पसरलेलं आहे.

महाराष्ट्रातलं ताडोबा जंगल वाघांसाठी प्रसिद्ध आहे. घोस्ट ट्री हे झाड इथं मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतं. खाण्याचा डिंक या झाडापासून मिळतो. पळसाची झाडंदेखील इथं मोठ्या प्रमाणात आहेत. रानडुक्कर, नीलगाय, रानगवा, बिबट्या, वाघ हे वन्यप्राणी इथं आढळतात.

**व्हिडिओ इथे पाहा...**

## सावध तो सुखी

**व्याख्याते – चंद्रशेखर ठाकूर**

दिनांक – ८ फेब्रुवारी २०२१




आठ फेब्रुवारीच्या साप्ताहिक सभेत श्री.चंद्रशेखर ठाकूर यांचं ‘सावध तो सुखी’ या विषयावर व्याख्यान झालं. रो. विवेक वेलणकर यांनी श्री.चंद्रशेखर ठाकूर यांची ओळख करून देताना सांगितलं की, श्री.चंद्रशेखर ठाकूर गेली बावन्न वर्षं मुंबई शेअर बाजारात कार्यरत आहेत. सी.डी.एस.एल.एमच्या साक्षरता विभागाचे ते प्रमुख आहेत. त्यांनी आत्तापर्यंत आर्थिक साक्षरता, आर्थिक प्रबोधन करण्यासाठी देशभरात सोळाशे पंचवीस कार्यक्रम सादर केले आहेत तसंच महाविद्यालयं, जेष्ठ नागरिक संघ, वर्तमानपत्रं यांसारख्या अनेक संस्थांमध्ये कार्यक्रम सादर केले आहेत. मराठी वृत्तपत्र लेखक संघाचा २००६ सालचा ‘अर्थवेध’ पुरस्कार त्यांना मिळाला आहे. हे सगळे कार्यक्रम ते विनामूल्य करतात हे विशेष...

जगात बुद्धिमान लोक आपल्या बुद्धीचा वापर कधीकधी वाईट कामासाठी करतात. बनावट मेल्स तयार करून

त्यांद्वारे सामान्य जनतेला फसवणं हाच त्यांचा मुख्य हेतू असतो. बनावट मेल ओळखणं सोपं असतं. ज्या मेलला रिप्लाय जात नाही तो बनावट मेल असतो असं ठाकूर सरांनी सांगितलं. बनावट मेलप्रमाणेच बनावट कॉल ओळखणंसुद्धा सोपं असतं. ज्या कॉलवर फोन केला तर फोन लागत नाही तो बनावट कॉल असतो. फोनचं सिमकार्ड ऑनलाईन बदलून देतो असं सांगणाऱ्या फोनवर कुठलेही डिटेल्स अजिबात देऊ नयेत. थोडा सारासार विचार प्रत्येकानं करायलाच हवा असं ठाकूर सर सांगतात. आपल्या फोनवर किंवा मेलवर आलेल्या प्रत्येक लिंकवर अजिबात क्लिक करू नये. एका क्लिकनी आपले बँकेचे सगळे डिटेल्स चुकीच्या व्यक्तीच्या हातात जाऊन आपण फसवले जाऊ शकतो. 'तुम्हाला लाखो रुपयांचं बक्षीस लागलं आहे, ते पैसे तुमच्या खात्यामध्ये जमा करण्याकरता आम्हाला तुमच्या खात्याचे डिटेल्स द्या'. असं फोनवर कोणी बोलत असेल तर तो आर्थिक फसवणुकीचा सररास घडणारा एक प्रकार आहे. याला विशेषतः ज्येष्ठ नागरिक बळी पडतात. ज्येष्ठ नागरिकांना एटीएमचे व्यवहार करतानासुद्धा हे फसवणुकाचे अनुभव येतात. एटीएम सेंटरमध्ये त्यांची कशी फसवणूक होते त्याची विस्तृत माहिती ठाकूर सरांनी दिली.

जेव्हा एखादं फ्री ॲप आपल्या फोनवर आपण डाऊनलोड करतो तेव्हा ते ॲप आपल्या फोनमधले फोटो, ऑडिओ फाइल्स, व्हिडीओज वापरण्याची परवानगी मागतं जी आपल्याला द्यावीच लागते. फ्री ॲपच्या मोहापायी आपण खूप मोठी जोखीम घेतो. आपले महत्त्वाचे सगळे डिटेल्स चुकीच्या व्यक्तीच्या हातात जाऊन आपण फसवले जाऊ शकतो असं ठाकूर सर सांगतात तसंच फोनवर आलेले मेसेजेस न वाचता अजिबात फॉरवर्ड करू नयेत असंही ठाकूर सर सांगतात. भाषण संपवताना ठाकूर सरांनी त्यांच्या वडलांचं एक वाक्य सगळ्यांना सांगितलं. ठाकूर सरांचे वडील त्यांना नेहमी एक गोष्ट सांगत की, जी-जी गोष्ट, वस्तू माणसानी तयार केलेली आहे, ती तो कधीही तोडू शकतो त्यामुळे जगात कुठलीच गोष्ट शंभर टक्के सुरक्षित नाही.

**व्हिडिओ इथे पाहा...**

## अर्थवशीर्ष – मला जागं करणारं स्तोत्र

**व्याख्याते – श्री. धनंजय गोखले**

दिनांक – १५ फेब्रुवारी २०२१

अर्थवशीर्ष-मला जागं करणारं स्तोत्र हा पंधरा फेब्रुवारीला संपन्न झालेल्या साप्ताहिक सभेचा विषय होता. श्री. धनंजय गोखले व्याख्याते होते. श्रीयुत गोखले गेली बावीस वर्षं प्रकल्प व्यवस्थापनामध्ये देश-विदेशात कार्यरत आहेत. शिक्षण क्षेत्रातल्या कामांसाठी त्यांना देश-विदेशात अनेक पुरस्कार मिळाले आहेत. भारत सरकारतर्फे आयोजित केलेल्या प्रकल्प व्यवस्थापनाच्या कार्यशाळेत त्यांनी मार्गदर्शन केले आहे. श्री. धनंजय गोखले यांना हार्मोनिअम वादनाचा छंद असून शास्त्रीय संगीताची आवड आहे. आत्तापर्यंत त्यांच्या ललित आणि व्यवस्थापन या विषयावरची आठ पुस्तकं प्रकाशित झाली आहेत.

अर्थवशीर्षाच्या काही ओळी म्हणत श्री.गोखले यांनी कार्यक्रमाची सुरुवात केली. आपल्याला हा विचार कसा सुचला? कशामुळं सुचला? याबद्दल श्री. गोखले मोकळेपणानं बोलले. याचं श्रेय ते त्यांच्या आजोबांना देतात.




लहानपणी आजोबांनी त्यांना प्रत्येक गोष्ट स्वतः करायला लावली त्यामुळे खूप गोष्टी त्यांना समजल्या. आपल्या गुरूस्थानी असलेल्या आजोबांनी स्वतः वाईटपणा घेत त्यांना त्यांच्यात असलेल्या क्षमतांचा वापर करायला लावला असं गोखले सांगतात. देवाला आपण काय सांगणार तू कसा आहेस... तर अर्थवशीर्ष हे गणपतीसाठी नसून आपल्यासाठी आहे. भगवतगीता हा डीग्री कोर्स असेल तर अर्थवशीर्ष हा त्याचा क्रॅशकोर्स आहे असं श्री. गोखले म्हणाले. अर्थवशीर्षात माणसानं काय करावं हे सांगितलं आहे तर भगवतगीतेत ते कसं करावं हे सांगितलं आहे. अर्थवशीर्षात माणसाच्या क्षमतांचं वर्णन आहे, स्वसंवाद आहे. अर्थवशीर्षाच्या आवतर्नाबाबत श्री. गोखले यांचं मत थोडं वेगळं आहे. आवर्तन म्हणजे वर्तनापर्यंत... म्हणूनच शेकडो वेळा, हजारो वेळा अर्थवशीर्ष म्हणण्यापेक्षा अर्थवशीर्ष म्हणताना आपण आपल्यात कसे बदल करतो याकडे लक्ष देणे गरजेचं आहे असं श्री. गोखले सांगतात यासाठी 'अव वक्तारं' ही अर्थवशीर्षातली ऋचा श्री. गोखले सरांनी विस्तृतपणे समजावून सांगितली. अर्थवशीर्ष माणसांच्या क्षमतांचा बेस असल्यामुळे प्रत्येकानं ते नक्की म्हणावं.

कार्यक्रमात पुढे रोटरी क्लब पुणे साऊथच्या सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना गोखले सरांनी मोकळेपणानी उत्तरं दिली. श्री गोखले सर भगवतगीता आणि अर्थवशीर्ष या दोन्ही विषयांचे कोर्सेस घेतात त्याबद्दल सरांनी सगळ्यांना माहिती दिली.

**व्हिडिओ इथे पाहा...**

**SPECIAL ANNOUNCEMENT**

To encourage personal attendance of Members and Anns/Spouses in the weekly meetings, RCPS Attendance Committee has started a luck draw which will be held in each meeting.

In this lucky draw, a Rotarian and Ann/Spouse will be selected by draw of name slips, at the hands of the Chief Guest of the week's program, from the members present in the previous week's meeting. Winners will be given a surprise gift from Attendance Committee. However, the winners should be personally present on the day of the draw to be eligible for the gift. If the winning member is not present his/her name will be passed on and another name slip will be selected from the eligible members. Only 2 such passes will be allowed in a given meeting; else the gift will be carried over.


So, to be the lucky winner, do keep attending the meetings regularly!!

**Winners of today's draw:** 1) Rtn. Shweta Karandikar 2) Ann Yamini Ponkshe

# Musicing - An Introduction To Musicology

**व्याख्याते – डॉ.सौरभ जांभेकर**


दिनांक – २२ फेब्रुवारी २०२१





संगीतशास्त्राची ओळख करून देणारा डॉ.सौरभ जांभेकर यांचा ‘‘ Musicing" An Introduction To Musicology हा वेगळा पण माहितीपूर्ण कार्यक्रम बावीस फेब्रुवारच्या साप्ताहिक सभेत पार पडला. रो.श्रीकांत परांजपे या कार्यक्रमाचे समन्वयक होते.


डॉ. सौरभ यांनी त्यांच्या वयाच्या सहाव्या वर्षापासून वाद्यसंगीत शिकायला, पियानो शिकायला सुरुवात केली. वेगवेगळ्या संगीत शिक्षकांचं त्यांना मार्गदर्शन लाभलं. दहावीनंतर मेकॅनिकल इंजिनीअरींगचा डिप्लोमा केल्यानंतर एक वेळ अशी आली की मेकॅनिकल इंजिनीअरींग डीग्री कोर्स करायचा किंवा पूर्णवेळ संगीतामध्ये करिअर करायचं यांपैकी एक गोष्ट निवडायची होती तेव्हा डॉ.सौरभ यांनी पूर्णवेळ संगीतामध्ये करिअर करण्याचं ठरवलं. शालेय जीवनात संगीत शिकत असताना ट्रिनीट कॉलेज ऑफ लंडनच्या तीन परिक्षा डॉ.सौरभ यांनी दिल्या होत्या. त्याच्या अनुषंगानं ट्रिनीट कॉलेज ऑफ लंडनने त्यांच्या कॉलेजच्या अभ्यासक्रम निश्चितीसाठी डॉ.सौरभ यांची निवड केली. तिथून पुढे डॉ.सौरभ यांनी कधीच मागं वळून बघितलं नाही.


सूर आणि ताल मिळून तयार होतं ते संगीत अशी संगीताची व्याख्या सांगून डॉ.सौरभ यांनी आपल्या व्याख्यानाची सुरुवात केली. जगात संगीताचे मुख्य दोन प्रकार आहेत. भारतीय शास्त्रीय संगीत आणि पाश्चात्य शास्त्रीय संगीत. दोनही प्रकारांतले काही ठळक फरक डॉ.सौरभ यांनी सांगितले. जसे की भारतीय शास्त्रीय संगीत हे निश्चीत अशा सुरावटींवर, विशिष्ट चौकटीत आणि निसर्गचक्रावर बांधलेलं आहे, तर पाश्चात्य शास्त्रीय संगीत हे अशा कोणत्याच



नियमांनी बांधलेलं नाही उलट निश्चीत अशा सुरावटींवर ते सूर असतातच असं काही नाही. भारतीय शास्त्रीय संगीतामध्ये एक प्रमुख गायक असतो आणि त्याला विविध वाद्यं वाजवून साथ करणारे साथीदार असतात तर पाश्चात्य शास्त्रीय संगीत हे मुख्यत्वे समुहानी गातात, एकापेक्षा जास्त गायक असतात. जरी प्राचीन काळापासून भारतीय शास्त्रीय संगीत अस्तित्त्वात असलं तरी तरी ते तेव्हापासून लिखित स्वरुपात आढळत नाही याउलट




पाश्चात्य शास्त्रीय संगीत हे लिखित स्वरुपात आढळतं. संगीतशास्त्र शिकण्याच्या तीन पायऱ्या आहेत. पहिली पायरी म्हणजे संगीत म्हणजे काय? ते कुठून आलं याचा अभ्यास, दुसरी पायरी म्हणजे त्याचा मानवी जीवनावर काय आणि कसा परिणाम होतो आणि संगीतशास्त्र शिकण्याच्या आणि ते वापरात आणण्याच्या विविध पद्धती म्हणजे तिसरी पायरी...


## SPECIAL ANNOUNCEMENT

To encourage personal attendance of Members and Anns/Spouses in the weekly meetings, RCPS Attendance Committee has started a luck draw which will be held in each meeting.

In this lucky draw, a Rotarian and Ann/Spouse will be selected by draw of name slips, at the hands of the Chief Guest of the week's program, from the members present in the previous week's meeting. Winners will be given a surprise gift from Attendance Committee. However, the winners should be personally present on the day of the draw to be eligible for the gift. If the winning member is not present his/her name will be passed on and another name slip will be selected from the eligible members. Only 2 such passes will be allowed in a given meeting; else the gift will be carried over.

So, to be the lucky winner, do keep attending the meetings regularly!!

**Winners of today's draw:** 1) Rtn. Mandar Purnapatre 2)Ann Aparna Kulkarni




नवीन प्रकारचं संगीत तयार करणं, नवीन प्रकारची वाद्यं तयार करणं, चित्रपटांचे संगीत तयार करणं चित्रपटांचे पार्श्वसंगीत तयार करणं, चित्रपटगीतांना चाल लावणं आणि गीताच्या दोन कडव्यांमध्ये कोणती वाद्यं, कुठे आणि किती वेळा वाजवायची हे ठरवणं, संगीतशास्त्राचा मानसशास्त्राच्या दृष्टीनं उपयोग करणं या सर्व क्षेत्रांत करिअर करण्याच्या दृष्टीनं संगीतशास्त्राचा उपयोग होतो असं आपल्या भाषणात डॉ.सौरभ यांनी सांगितलं. भाषणात शेवटी श्रोत्यांच्या प्रश्नांना डॉ.सौरभ यांनी मोकळेपणानं उत्तरं दिली.

➢ **क्लबच्या साप्ताहिक सभांचा सभेनुसार गोषवारा**

**तुमचा लेख आवर्जून द्या...**
**समन्वयक**
**एके / यामिनी पोंक्षे**

## साप्ताहिक सभा

## कौशल्य विकास केन्द्र, वेल्हे

बारा फेब्रुवारीला सकाळी रो.प्रे.सुदर्शन नातू आणि रो.दत्ताजी आंबवणे पासली, कुंबळे या ठिकाणी पुढचे काही प्रोग्राम्स ठरवण्यासाठी गेले होते त्याबद्दल लवकरच सर्वांना सांगण्यात येईल. रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथच्या जवळपास सर्व सदस्यांना माहीत आहे की क्लबनी पाऊलवाट, पासली इथे २०१६ साली कौशल्य विकास केंद्र सुरु केलं. त्याठिकाणी रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथनी लेथ मशीन्स, शिवणयंत्रं आणि इतर काही सोयी उपलब्ध करून दिल्या. रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथ या केंद्राला वेळोवेळी मदत करत असतो. जिवापाड मेहनत करून श्री. आशीष क्षीरसागर यांनी आजूबाजूच्या खेड्यांतल्या लोकांना स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी तयार केलं आहे. या प्रयत्नांना किती यश आलं आहे आणि त्या केंद्राचा उपयोग कसा होतोय हे या व्हीडीओमार्फत रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथच्या सर्व सदस्यांना समजू शकेल. हे सर्व पाहिल्यानंतर रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथच्या सर्व सदस्यांना आनंद होईल. सर्व सदस्यांनी त्याठिकाणी भेट द्यावी आणि मदतीचा हात पुढे करावा असं आवाहन रो.प्रे. सुदर्शन नातू यांनी केलं आहे.

**व्हिडिओ इथे पाहा...** **व्हिडिओ इथे पाहा...** **व्हिडिओ इथे पाहा...**

## *Registration for Inoculation*

Registration for inoculation will open any day now for senior citizens. Please keep watching the 'CoWin' site or app. The link for the site is given below. As of now the site and the app are open only for viewing and to login by vaccinators. The option to register will be available soon after 15th February. You can register with your PAN card with a few more details. You will be able to opt for the hospital convenient for you. Once your registration is successful, you will get a 14 digit registration number via SMS. Later, you will get another SMS giving you a date and time for vaccination at the hospital you chose. If you are particular about the vaccine then, please check with the hospital if they are offering that vaccine.

https://www.cowin.gov.in/home

Please share with citizens above 50.

# सोयाबीनपासून दूध आणि दुग्धजन्य पदार्थ तयार करण्याची कार्यशाळा



अठरा फेब्रुवारीला सांगवी, ता. भोर इथे रो.दत्ताजी यांच्या फार्म हाऊसवर रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथनी सोयाबीनपासून दूध आणि दुग्धजन्य पदार्थ तयार करण्याची कार्यशाळा आयोजित केली होती. ज्ञान प्रबोधिनीच्या भोर, वेल्हे तालुक्यांतल्या चार गावांतल्या महिला बचत गटांच्या वीस गटप्रमुख महिलांना हे प्रशिक्षण दिले गेले. चेतरन फूड प्रॉडक्ट्सचे निवृत्त आय.ए.एस. ऑफिसर श्री.रणजित पाल यांनी हे प्रशिक्षण दिलं. कार्यक्रम अतिशय नियोजनबद्ध आणि सुंदर झाला.

रो.प्रे.सुदर्शन नातूंनी सर्वांचं स्वागत केलं आणि कार्यशाळेचं प्रयोजन सांगितलं. पीपी रो.गोरे सरांनी श्री.पाल यांची ओळख करून दिली आणि कार्यशाळेला सुरुवात झाली. कार्यशाळा दोन सत्रांत झाली.

त्यांनी सोयाबीनपासून दूध, दही आणि पनीर (टोफू) तयार करून दाखवलं. महिलांनी स्वतः पुढाकार घेऊन या गोष्टी करून बघितल्या. श्री.पाल यांनी सोयापासून तयार केलेले दही, लस्सी, ताक, पनीर मटर, रायता हे पदार्थ आणले होते. त्यांची सर्वांनी चव घेतली.

कार्यशाळेनंतर सर्व प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रं देण्यात आली. प्रबोधिनीच्या मा. सुवर्णाताईंनी मनोगत व्यक्त करताना सांगितलं की, हा उपक्रम प्रत्यक्ष राबवून याचा लाभ गावातल्या कुपोषित मुलांपर्यंत पोहचवण्याचं ध्येय प्रबोधिनी पुढील काही महिन्यांत साध्य करणार आहे. श्री.रणजित पाल यांनी (सुवर्णाताईंकडे) त्यांच्याकडे एक मिक्सर भेट दिला आणि त्याचा उपयोग महिलांनी दूध उत्पादन करण्यासाठी करावा असं सुचवलं. महिलांना आत्मनिर्भर होण्यासाठी हॅप्पी व्हिलेज उपक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या या कार्यशाळेचा निश्चित उपयोग होईल.

रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथतर्फे श्री.रणजित पाल यांना स्मृतिचिन्ह आणि गौरवपत्र देऊन सन्मानित करण्यात आलं. रो.पीई.अतुल अत्रे यांनी आभारप्रदर्शन केलं.

कार्यक्रमाचं पूर्ण नियोजन रो. दत्ताजी, ॲन अंजली देवधर आणि नचिकेत देवधर यांनी केलं. सकाळी सर्वांचं स्वागत फार्मवरचा ताजा उसाचा रस आणि ब्रेकफास्ट यानं झालं तर दुपारी जेवणाचा उत्तम बेत ठेवला होता. कार्यक्रमाला ॲन माधवी, ॲन यामिनी, फर्स्ट लेडी सुगंधा, ॲन अंजली, ॲन शोभाताई तसंच पीडीजी रो.भाऊसाहेब, रो.पीपी गोरे, रो.पीपी देशपांडे, रो.भाऊ सहस्रबुद्धे, रो.अरविंद शिराळकर, रो.विलास आपटे, रो.निरंजन ठाणगावकर, रो.पीई.अतुल अत्रे उपस्थित होते.

## प्लाझ्मादान जनजागृती




तेवीस फेब्रुवारीला ब्राह्मण मंगल कार्यालय, सदाशिव पेठ इथल्या रिक्षा थांब्यावरच्या रिक्षाचालकांना प्लाझ्मादानाचं महत्त्व सांगून प्लाझ्मादानाविषयीची माहिती छापलेल्या पडद्यांचे वाटप करण्यात आलं. रो.दत्ता पाषाणकर यावेळी उपस्थित होते.

## पोलिओ प्लस एन आय डी

एकतीस जानेवारीला पोलिओ लसीकरण कार्यक्रम अतिशय उत्तम झाला. पीपी डॉ. किरण आणि डॉ. गीतांजली पुरोहित यांच्या सहयोगानं रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथतर्फे दोन ठिकाणी बूथ ठेवले होते. डॉ. किरण यांचा स्टाफ आणि रोटेरियन्स यांनी उपस्थित राहून खूप उत्साहानं पोलिओ लसीकरण कार्यक्रमात भाग घेतला. रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथतर्फे एक हजार मुलांना पोलिओ डोस दिले गेले. जातीनं हजर राहून रो.पीडीजी भाऊसाहेब यांनी खूप उत्साहानं पोलिओ लसीकरण कार्यक्रमात भाग घेतला. पोलिओ लसीकरण कार्यक्रम झाल्यावर डॉ. किरण आणि डॉ. गीतांजली यांच्याकडे फेलोशिप एंजॉय केली.

- **अध्यक्ष सुदर्शन संवाद**
- **विविध विभाग संचालक किंवा कमिटी मुख्य संवाद**
- **क्लबमधील विविध प्रोजेक्ट्स, कार्यक्रम, फेलोशिप्स**
- **जावे त्यांच्या क्षेत्रा.../ मागील एखाद्या प्रोजेक्टची गोष्ट**


**तुमचा लेख आवर्जून द्या....**
**समन्वयक**
**आनंद / यामिनी**

**क्लबकारी**

# कोहिनूर

रो. डॉ सुभाष देशपांडे

ऐकण्यासाठी क्लीक करा...





जेव्हा नादीरशहानं प्रथम कोहिनूर हिरा बघितला तेव्हा त्याच्या तोंडून शब्द बाहेर आले 'तेजाचा पर्वत' तेव्हापासून या हिऱ्याला को-हि-नूर असं संबोधतात. कोहिनूर हा गोवळकोंडा भागातल्या कोलार खाणीत सापडलेला हिरा आहे. त्याचा उल्लेख बाबराच्या लिखाणात आहे. तो हिरा वरंगळ, जी आजच्या तेलंगण इथल्या ककाटीया वंशजांची राजधानी होती, त्या ककाटीया वंशातल्या प्रताप रूद्र या राजाच्या ताब्यात होता. १३०९ साली अल्लाउद्दीन खिलजी या दिल्लीच्या सुलतानानं आपला सरदार मलिक कफूर याला वरंगळवर स्वारी करण्यास धाडलं. १३१० साली मलिक कफूरनं वरंगळवर हल्ला केला आणि १६ फेब्रूवारी १३१० साली वरंगळ जिंकलं. राजा प्रताप रूद्र सरदार मलिक कफूरला शरण गेला आणि त्यानं त्याची सर्व संपत्ती अल्लाउद्दीन खिलजीला दिली त्यामध्ये एक अप्रतिम हिरा होता. तोच हा कोहिनूर होय.

कोहिनूर मूलतः एकशेएक्यांण्णव कॅरेट्स किंवा बत्तीस पूर्णांक दोन ग्रॅम्स वजनाचा हिरा होता. तो अल्लाउद्दीन खिलजीच्या वंशजांकडून बाबराकडे १५२६च्या पानिपत लढाईनंतर आला. कोहिनूर हिरा शहाजहानच्या मयूर सिंहासनावर बसवला होता. सन १६५८मध्ये शहाजहानचा मुलगा औरंगजेब याच्या काळात कोहिनूर हिऱ्याला परत पैलू पाडण्यात आले असावेत आणि त्याचं वजन एकशे शहाऐंशी कॅरेट्स किंवा सदतीस पूर्णांक दोन ग्रॅम्सपर्यंत खाली आलं असण्याची शक्यता आहे. १७३९ साली नादीरशहानं दिल्लीवर आक्रमण केलं आणि दिल्ली लुटली. त्या लुटीत कोहिनूर हिरा नादीरशहाच्या ताब्यात आला. १७४७ साली नादीरशहाची हत्या झाली त्यानंतर कोहिनूर त्याच्या नातवाकडून १७५१ साली अहमदशहा दूराणी या अफगाण राजाकडे आला. त्याचा वंशज शुजाशहा दूराणी यानं कोहिनूर हिरा शीख साम्राज्याचा संस्थापक रणजीतसिंह याला त्यानं दिलेल्या आश्रयाच्या बदल्यात बहाल केला.

रणजीतसिंह यांनी रत्नपारख्यांकडून कोहिनूर हिरा दोन दिवस पारखून घेतला. त्याचा अस्सलपणा आणि किंमत आजमावली. रत्नपारखी हिऱ्याची किंमत करू शकले नाहीत. रणजीत सिंहानी कोहिनूर हिरा आपल्या पगडीत तसंच हस्तबंधात घातला होता. तो त्यांनी गोविंदगड किल्ल्यात जपून ठेवला होता. रणजीतसिंहाच्या मृत्यूनंतर कोहिनूर हिऱ्याच्या मालकीहक्काबद्दल वाद सुरू झाला. कोहिनूर हिरा रणजितसिंहाचे जेष्ठ पुत्र खरकसिंह यांच्या ताब्यात होता.१८३९ साली खरकसिंहाचे प्रधान धीयान सिंह यांनी खरकसिंहाचं राज्य उलथवून टाकले. आता कोहिनूर हिरा धीयानसिंह यांचे भाऊ आणि जम्मूचे राजे गुलाबसिंह यांच्या ताब्यात आला. १८४१ सालच्या जानेवारी महिन्यात गुलाबसिंहानं कोहिनूर हिरा रणजितसिंहाचे पुत्र व शीख साम्राज्याचे सम्राट शेरसिंह यांच्या ताब्यात त्यांची मेहेर नजर मिळवण्याकरता दिला. १५ सप्टेंम्बर १८४३ साली शेरसिंह आणि त्यांचा प्रधान धीयान सिंह यांची हत्या झाली परंतु लगेच दुसर्याच दिवशी त्यांची हत्या करणाऱ्यांना धीयानसिंह यांचा पुत्र हिरासिंह यानं ठार मारलं आणि शेरसिंगच्या पाच वर्षांच्या मुलाला, दुलीपसिंहाला गादीवर बसवलं. कोहिनूर हिरा त्याच्या दंडावर बांधला जायचा. १८४४ साली आणि १८४९ साली शीख साम्राज्याची इंग्रजांशी दोन वेळा लढाई झाली. दुसऱ्या लढाईतल्या पराभवानंतर पंजाब राज्य इंग्रजांनी खालसा केलं आणि कोहिनूर राणी व्हिक्टोरीयाकडे सुपुर्द केला गेला. त्यावेळेस दुलीपसिंह अकरा वर्षांचा होता.

कोहिनूर इंग्लंडला नेण्याअगोदर एका धोब्याकडून हरवला होता पण सुदैवानं परत मिळाला. एका तिजोरीत कोहिनूर मोहरबंद करून, ती तिजोरी परत दुसऱ्या मोठ्या तिजोरीत बंद करून ६ एप्रिल १८५० साली एच एम एस मेडी या जहाजातून तो हिरा इंग्लंडला पाठवण्यात आला. वाटेत कॉलरासारखे आजार, वादळं वगैरे अडचणींना तोंड देत १ जुलै १८५० साली कोहिनूर इंग्लंडला पोहोचला. ३ जुलै रोजी बकींगहॅम राजवाड्यात राणी व्हिक्टोरीयाला कोहिनूर देण्यात आला. त्यावेळेस कोहिनूर हिऱ्याची किंमत एक ते दोन मिलिअन पाऊंड्स होती. १८५१ साली कोहिनूर एका मोठ्या प्रदर्शनात ठेवला होता, जेणेकरून तो सर्वसाधारण जनतेला पाहता येईल. परंतु कोहिनूरच्या निस्तेजपणामुळे जनतेला तो फारसा आवडला नाही. कोहिनूर मूलतः एकशे एकोणसत्तर पैलूंचा होता. त्याचप्रमाणं तो आकारानं बेढब होता त्यामुळे प्रिन्स् अलबर्ट, जे राणी व्हिक्टोरीयाचे पती होते, त्यांनी कोहिनूरला परत पैलू पाडण्याचं ठरवलं. त्याकरता त्यावेळेस आठ हजार पाउंड्स खर्च आला. कोहिनूरचं वजन एकशे एक्याण्णव कॅरेट्स किंवा अडतीस पूर्णांक दोन ग्रॅम्स वरून एकशे पाच पूर्णांक सहा कॅरेट्स किंवा एकवीस पूर्णांक दोन ग्रॅम्स झालं. साधारणपणं तेजस्वी हिऱ्याला अठ्ठावन्न पैलू असतात. कोहिनूरला सहासष्ठ पैलू आहेत. राणी व्हिक्टोरीयाच्या ब्रोचवर कोहिनूर बसवला होता. राणीच्या मृत्यूनंतर तो राणी अलेक्झान्ड्रीया, जी राजा एडवर्ड सातवा याची पत्नी होती, तिच्या मुकूटावर चढवण्यात आला त्यानंतर राणी मेरी आणि क्वीन मदर इलिझाबेथ यांच्या मुकुटावर बसवण्यात आला. २००२ साली क्वीन मदरच्या मृत्यूनंतर तिच्या शवपेटीवर ठेवण्यात आला होता. दुसऱ्या महायुद्धात कोहिनूर निरनिराळया ठिकाणी लपवण्यात आला होता. सध्या कोहिनूरची काचेची प्रतिकृती लंडन टॉवरमध्ये प्रदर्शीत करण्यात येत आहे. कोहिनूरवर भारत, पाकिस्तान, इराण, अफगाणिस्तान हक्क सांगत आहेत... परंतु ब्रिटिश सरकार सर्व हक्क झुगारून देत आहे. कोहिनूरच्या कथेवर कित्येक चित्रपट निघाले आहेत. असा आहे हा भारताचं गर्वस्थान, तेजोमय पर्वत, कोहिनूर...

# विरह

ॲन कांचन बदामीकर

सुखाचा संसार
पण वेळ नाही एकमेकांसाठी फार
संसाराच्या रामरगाड्यात
प्रेम झालं हद्दपार

म्हटलं प्रेम पुन्हा आणायचं असेल
तर हवी थोडी दुरी
तेव्हाच होईल मनीची इच्छा पुरी

प्रेमाची गोडी वाढवण्यासाठी
हवी विरहाची साखर
विरहच करेल आमच्यावर
प्रेमाची पाखर

म्हटलं मग यांना
मला बाई एकांत हवा
सगळ्या जबाबदाऱ्या पार पाडताना
जीव माझा शिणायला लागला

त्यांनी ही दिली मोठ्या मनानं परवानगी
म्हटलं चला हिंडू मैत्रिणींसोबत
करू जीवाची मुंबई

कसचं काय मेलं
जीव कशातच रमेना
घास तोंडात घातला
की चेहरा यांचा समोरून हटेना

यांना हे आवडतं, त्यांना ते आवडतं
सांगण्यात सगळा वेळ मी घालवला
माझं पुराण ऐकून मैत्रिणींच्या ट्रिपचा
इस्कोट झाला

इकडे पण नव्हती कथा वेगळी
पावला पावला वर होती
माझ्याविना सगळी गोष्ट अडली

कधी नव्हे तो यांनी शंभर वेळा
मला फोन केला
नवऱ्याचं माझ्यावरचं प्रेम बघून
सख्यांचा जळफळाट झाला

पटला मला अगदीच पटला
विरहाचा महिमा
माझ्या मैत्रिणींच्या सुखासाठी
मीही त्यांना हा कानमंत्र दिला


- सभासदांचा सहभाग वाढावा हा हेतू
- सभासदांच्या कलागुणांना वाव
- चित्रकला, फोटोग्राफी, कथा, लेख, कविता
- व्यक्तिगत, कौटुंबिक, व्यावसायिक गवसणी

तुमचा लेख आवर्जून द्या....
समन्वयक
आनंद कुलकर्णी / यामिनी पोंक्षे

कलाकारी

# शिवाजी महाराज – एक आकलन

रो. आयपीपी अभिजीत जोग

ऐकण्यासाठी क्लीक करा...

शिवजयंतीच्यादिवशी विचार करताना लक्षात आलं की, शिवाजी महाराजांचं व्यक्तिमत्व आणि कर्तृत्व इतकं प्रचंड आणि बहुपैलू आहे की, त्याच्या प्रत्येक पैलूचं आकलन करण्यास संपूर्ण जन्मही पुरणार नाही. माझी अवस्थाही काहीशी अशीच आहे.

शाळेत बाबासाहेब पुरंदरेंनी लिहिलेल्या शिवचरित्राच्या दहा भागांची पारायणं केली तेव्हा भावले ते अफझलखानाचा कोथळा काढणारे आणि शाहिस्तेखानाची बोटं छाटणारे शिवाजी महाराज. महाराजांचं शौर्य आणि धैर्य यांची वर्णन वाचताना ‘शिवाजी’ या नावाची भूल पडली ती कायमचीच.

कॉलेजात पदार्पण करताना महाराजांनी आपल्या समाजाला ‘स्व’त्व आणि स्वाभिमान यांची जी ओळख करून दिली, ती विशेष महत्त्वाची वाटू लागली. ज्या महाशक्तिशाली आणि क्रूरकर्मा औरंगजेबाच्या दरबारात मोठमोठ्या पठाण, तुर्की, इराणी, राजपूत सूरमांची डोळे वर करून बघायची हिंमत होत नव्हती, तिथे झालेला अपमान सहन न होऊन कडाडणारे आणि तडक निघून जाणारे शिवाजी महाराज मनाला भावले. स्वधर्म, स्वभाषा, स्वराज्य यांची जाणीव अंधारात चाचपडणाऱ्या समाजात निर्माण करणारे आणि त्यासाठी आयुष्य पणाला लावणारे शिवाजी महाराज खऱ्या अर्थानं ‘हिरो’ वाटू लागले.

एमबीए करताना आणि त्यानंतर उद्योगविश्वात करियर करताना शिवाजी महाराजांचा ‘मॅनेजमेंट गुरू’ हा पैलू आकर्षित करून गेला. मॅनेजमेंटमधलं ‘स्पॅन ऑफ कंट्रोल’चं तत्त्व अष्टप्रधान मंडळाच्या रुपात अमलात आणणारे, आपण स्वराज्याची निर्मिती करतो आहोत ती लोककल्याणासाठी याचं भान ठेवणारे, ‘रयतेला त्रास देऊ नका’, ‘त्यांच्या मालकीच्या गवताच्या काडीलाही हात लावू नका’ अशा कडक सूचना देणारे, शेतसार्याच्या नव्या पद्धती घालून देणारे शिवाजी महाराज खऱ्या अर्थानं व्यवस्थापन शास्त्राचे गुरू होते हे जाणवू लागलं. आज सर्वमान्य झालेलं ‘वेल्फेअर स्टेट’चं तत्व प्रत्यक्षात आणणारे ते इतिहास काळातील पहिले राज्यकर्ते होते हे लक्षात येऊ लागलं.



ज्या देशात गेली हजारो वर्षं समुद्र पर्यटन हे निषिद्ध मानलं गेलं, त्या आपल्या भारताच्या

भविष्यातल्या सुरक्षेसाठी समुद्रावर हुकूमत असणं गरजेचं आहे हे ओळखून, भारताच्या आरमाराची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या महाराजांचं अलौकिकत्व लक्षात येऊ लागलं.

मोगल, आदिलशाही, कुतुबशाही, निजामशाही, इंग्रज, पोर्तुगीज यांसारख्या एकाहून एक मातब्बर शत्रूंशी एकाच वेळी लढताना त्यांनी जी अजोड मुत्सद्देगिरी दाखविली त्याने मन थक्क होऊ लागलं.

'Playing to your strength' हे मॅनेजमेंटचं एक महत्त्वाचं तत्त्व. शिवाजी महाराजांची युद्धनीती म्हणजे या तत्त्वाचा मूर्तिमंत वस्तुपाठच. सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात यायला भाग पाडून गनिमी काव्यानी त्यांनी एकाहून एक मातब्बर शत्रूला जे पाणी पाजलं त्याची बरोबरी कुठेच आढळत नाही.

मॅनेजमेंटमध्ये 'व्हिजन'ला फार महत्त्व दिलं जातं. वेगवेगळ्या क्षेत्रात महाराजांनी जी व्हिजन दाखविली तिला तर तोडच नाही. सक्तीने मुसलमान धर्म स्वीकाराव्या लागलेल्या नेताजी पालकरांना पुन्हा हिंदू धर्मात प्रवेश देऊन 'घरवापसी'ची सुरुवात त्यांनी चारशे वर्षांपूर्वीच केली होती. तसंच राज्यकारभारावर बसलेला फारसी भाषेचा पगडा दूर करून मराठीचा वापर व्हावा यासाठी 'राज्यव्यवहारकोष' तयार करण्याचं अत्यंत महत्त्वाचं काम हाती घेतलं ते महाराजांनीच.

स्वतःचा व्यवसाय सुरू केल्यावर प्रकर्षाने जाणवलेला शिवाजी महाराजांचा पैलू म्हणजे त्यांचं नेतृत्व. इंजिनिअर, एमबीए, अकाऊंटंट अशा उच्चशिक्षित लोकांना एकत्र आणून त्यांच्यात संघभावना निर्माण करणं, त्यांना प्रेरित करणं, त्यांचं धैर्य उच्च पातळीवर राखणं किती अवघड आहे, याचा अनुभव घेत असताना महाराजांनी दऱ्याखोऱ्यात लंगोटी लावून फिरणार्या मावळ्यांना एकत्र आणून, मोठमोठ्या सर्वशक्तिमान पातशह्यांना गुडघे टेकायला लावणारी टीम कशी तयार केली असेल; आपल्या राजाखातर जीव ओवाळून टाकायला तयार असणारी तानाजी, येसाजी, बाजीप्रभू, शिवा न्हावी यासारखी हजारो माणसं कशी घडविली असतील... हा विचार करून नतमस्तक झालो.

आपण छोट्या-छोट्या अडचणी आल्या तरी गांगरून जातो. मग शिवाजी राजांनी छाती दडपून टाकणार्या हिमालयाएवढ्या अडचणींवर धीरोदत्तपणे कशी मात केली असेल? आग्र्याहून सुटका, पन्हाळ्याच्या वेढ्यातून बाहेर पडून विशाळगडाकडे घेतलेली झेप, दीड लाख शत्रूसैन्याच्या तळावर अवघ्या शंभर मावळ्यांना सोबत घेऊन घातलेला छापा... या प्रत्येक वेळी घेतलेली प्रचंड मोठी रिस्क आणि प्रत्येकवेळी मिळवलेलं लखलखतं यश... कुणीही थक्क होऊन तोंडात बोटं घालावी अशीच ही कामगिरी.

आता जसं वय वाढलंय तसा मनाला भिडणारा शिवाजी राजांचा पैलू म्हणजे 'राजयोगी' हे त्यांचं रुप. मध्ययुगीन काळातील बादशहांची विलासी जीवनशैली आणि नैतिक अधःपतनाच्या कहाण्या आपण नेहमीच ऐकतो. त्या पार्श्वभूमीवर शिवाजी महाराजांचं चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्त्व आणि विरक्त वृत्ती यांच्याबद्दलचा आदर शतगुणीत होतो. साधूसंतांचा सन्मान करणारे, तुकाराम महाराज आणि रामदास स्वामींच्या पायाशी बसणारे शिवाजी महाराज हे खरोखर श्रीमंत योगी होते. चैनबाजी आणि विलासी राहणीपासून फटकून राहणारा, मदांध तख्त फोडणारा पण जिंकलेलं राज्य संतांच्या पायाशी ठेवणारा, लक्ष्मीच्या आधी सरस्वतीचा सन्मान करणारा, स्वाभिमानाशी कदापि तडजोड न करणारा

जो मराठी बाणा आहे, त्याची मुहूर्तमेढ शिवाजी राजांनी केली आहे हे निःसंशय

शिवाजी महाराजांच्या जीवनाचा आणखी एक पैलू हल्ली मला खूप भिडतो. कितीही अलौकिक असले तरी शेवटी महाराज एक माणूसच होते. प्रचंड अडचणी आणि संकटं यांच्या दडपणासमोर कधीतरी त्यांच्या रागाचा स्फोट होत असे पण अशा प्रत्येकवेळी त्यांच्या सद्सद्विवेकबुद्धीने त्यांच्या रागावर मात केली आणि शेवटी जे योग्य तेच त्यांनी केलं. आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे ज्या कोणावर ते रागावले त्या प्रत्येकाने ते कधीही मनात ठेवलं नाही. आपल्या राजाला त्यांनी नेहमी शुभेच्छा आणि आशीर्वादच दिले.

याचं एक हृदयस्पर्शी उदाहरण मला नेहमी आठवतं. फिरंगोजी नरसाळा या सरदारानं चाकणची गढी शाईस्तेखानाच्या प्रचंड सैन्यासमोर दोन महिने लढविली होती. अशा या बहाद्दर योद्ध्यावर एकदा काही कारणानं महाराज खूप रागावले आणि त्यांनी फिरंगोजींना तोफेच्या तोंडी देण्याचा हुकूम दिला.

शिक्षेच्या अंमलबजावणीची तयारी सुरु झाली. एकीकडे शिवाजी राजांच्या डोळ्यांसमोर फिरंगोजींच्या आठवणी तरळू लागल्या. फिरंगोजींनी राजांना अंगाखांद्यावर खेळवलेलं. त्याचं प्रेम, स्वामिनिष्ठा, शौर्य हे आठवून राजांना आपली चूक उमगली. तशी त्यांनी धाव घेतली. फिरंगोजींना तोफेच्या तोंडी बांधलं होतं. तोफेला बत्ती देण्याचा अवकाश होता. नशीब म्हणून महाराज वेळेवर पोहोचले आणि फिरंगोजींना उतरवण्याचा हुकूम दिला.

महाराजांनी फिरंगोजींना मिठी मारली. दोघांच्याही डोळ्यांतून अश्रू वाहत होते. फिरंगोजी उद्गारले, ''कशाला रं राजा धावत आलास. तुझ्या शब्दाखातर हसत तोफेच्या तोंडी गेलो असतो आणि जातानाही तुला आशीर्वादच दिले असते.''

जगाच्या इतिहासात खूप राजे, बादशाह, सम्राट होऊन गेले पण प्रजेचं असं प्रेम लाभलेला, पराक्रम आणि वैराग्य, मुत्सद्देगिरी आणि चारित्र्य, देशाभिमान आणि प्रजेचं हित, तडफ आणि दूरदृष्टी यांचा अजोड मिलाफ असलेला राजा शिवाजी राजाशिवाय दुसरा कोणीही नाही.

ज्याच्या महतीचं आकलन करण्यासाठी सगळा जन्म घालवावा लागतो आणि तरीही तो दशांगुळे वर उरतोच, असा शिवाजीराजा आपल्याला लाभला, हे आपलं आणि भारताचं परमभाग्यच.


- **सभासदांचा वेगवेगळ्या विषयांवरचे दृष्टिकोन मांडण्याची जागा...**
- **हलकंफुलकं लेखन हवं**
- **पुस्तंक, नाटक, चित्रपट, मालिका, वेबसिरीज**
- **राजकारण, समाजकारण, चालू घडामोडी**

**तुमचा लेख आवर्जून द्या...**
**समन्वयक**
**योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे**

**दृष्टिकोन**

## विशेष — Donations

| | |
|---|---|
| सुधा देशपांडे | रु.५०००/- |
| अक्षय किरपेकर | रु. १५०००/- |
| रो. मृदुला घोडके | रु. १५०००/- |
| पीडिजी रो. भाऊसाहेब कुदळे आणि ॲन सौ. शोभाताई | $१००० |

**सोयाबीन खरेदीसाठी**

| | |
|---|---|
| रो. विलास आपटे | रु ५०००/- |

## विशेष

- शुभेच्छा
- स्मृती
- गवसणी
- या महिन्यात मागच्या वर्षांत...

तुमचा लेख आवर्जून द्या...
समन्वयक
श्वेता करंदीकर

## टीम बुलेटिन

### सदरं

- मुखपृष्ठ ..........................श्वेता.............. विधानं/ कोट्स
- संपादकीय/ अध्यक्षीय........योगेश /सुदर्शन
- रोटरी..........................योगेंद्र / अभिजित............... रोटरी मंच/RI
- डिस्ट्रिक कनेक्ट...........योगेंद्र / अभिजित........ डिस्ट्रिक घडामोडी
- क्लबकारी.........................आनंद / यामिनी..........क्लब घडामोडी
- कलाकारी.........................आनंद / यामिनी..........सभासद गुणदर्शन
- दृष्टीकोन........................योगेंद्र / अभिजित..........पुस्तक, चित्रपट इ.
- विशेष.............................श्वेता....................शुभेच्छा, स्मृती
- क्रिएटिव्ह असिस्टन्स आणि कोऑर्डिनेशन..........टीम सहयोगी